पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक १३/०२/२०२५**

# " तरंग- २०२५ "

## कर्तव्य आणि संस्कृतीचा सन्मान, संगीतमय उत्साहाचा अभिमान

पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस दलामध्ये कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार हे सतत विविध बंदोबस्त,निवडणुका,मोर्चे,अधिवेशन,इ.कर्तव्यावर तैनात असल्याने पोलीस अधिकारी/अंमलदार समवेत त्यांचे कुटूंबिय देखील ताणतणावामध्ये असतात मागील २०२४ हे वर्षे लोकसभा/विधानसभा निवडणुका विविध महत्वाचे बंदोबस्त, व्हिव्हिआयपी दौरे यामध्ये व्यस्त गेल्याने पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांच्या कुटुंबियासोबत आनंदाचे क्षण व्यतित करता यावेत व उत्साहाचे वातावरण मिळावे यासाठी पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे संकल्पनेतुन तरंग-२०२५ हा मनोरंजनपर कार्यक्रम दि.१५/०२/२०२५ रोजी सांय.०५/३० ते १०/०० वा.चे पर्यत पोलीस मुख्यालय शिवाजीनगर पुणे येथे आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाचे प्रायोजक श्री.पुनित बालन (पुनित बालन ग्रुप)हे आहेत.

तरंग २०२५ या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. श्री. अजितदादा पवार, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री पुणे जिल्हा, मा.श्री. मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, सहकार व नागरी विमान वाहतूक,मा. श्री. चद्रंकांत(दादा) पाटील, मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य, मा. श्रीमती माधुरीताई मिसाळ, राज्यमंत्री नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ व इतर मान्यवर उपस्थित राहणार असुन सदर कार्यक्रमांतर्गत 'अजय अतुल लाईव्ह' संगीत रजनी हा मनोरंजनपर कार्यक्रम ठेवण्यात आलेला असुन बॉलिवुड व मराठी सिने सृष्टीतील कलाकार उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास पुणे शहरातील सर्व शांतता कमिटी /मोहल्ला कमिटी सदस्य व इतर महत्वाचे व्यक्ती तसेच सर्व प्रिंट व इलेक्ट्रानिक मिडीयाचे संपादक व प्रतिनिधी यांना देखील आमंत्रित करण्यात आले आहे.